# दखल इंग्रजी पुस्तकाची

## सन्मानाने देहविधी!

शरीराच्या नैसर्गिक गरजांबाबत उघड चर्चा करणे बहुतेक सर्वच देशांत असभ्यपणाचे मानले जाते. दैनंदिन जगण्यात अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गरजांइतकेच महत्त्व खरे तर नैसर्गिक देहविधींना असायला हवे. पण भारतासारख्या देशांत जिथे निवाऱ्याचीच समस्या उग्र आहे, तेथे शौचालयांच्या बाबतीत कोण आणि काय बोलणार? खेडेगावांतील हागणदाऱ्यांच्या जोडीला मूलभूत सोयीसुविधांचा अभाव घेऊन सतत वाढणाऱ्या शहरांत रस्त्याच्या कडेला, रेल्वेमार्गाच्या बाजूला नव्या हागणदाऱ्या तयार झालेल्या दिसतात. असंख्य माणसे लाज बाजूला ठेवून अक्षरशः जनावरांच्या पातळीवर उघड्यावर देहविधी उरकतात. त्यातून आरोग्यविषयकही अनेक प्रश्न निर्माण होतात. विकसनशील आणि अविकसित देशांतील नागरिकांच्या 'सन्मानपूर्वक देहविधी'च्या हक्कासाठी जागतिक आरोग्य संघटनेने सहस्रकाचे विकास उद्दिष्ट आणि आरोग्यरक्षणार्थ स्वच्छता (एमडीजीएस) मोहिमेची आखणी केली. त्याअंतर्गत भारतात काय स्थिती आहे, याचे विस्तृत विवेचन 'स्क्वॉटिंग विथ डिग्निटीः लेसन्स फ्रॉम इंडिया' या पुस्तकात कुमार आलोक यांनी केले आहे.




जिल्हाधिकारी म्हणून कुमार आलोक यांनी ही मोहीम राबवताना आलेले नेत्यांचे आणि प्रशासनाचे अनुभव तसेच अनेक प्रकारची उपयुक्त माहितीही दिली आहे. २००१च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागांत ७८ तर शहरी भागांत २६ टक्के लोक दुसरी सोय नसल्याने उघड्यावरच शौचास बसतात अशी नोंद आहे. लेखक म्हणतो की धोरणे ठरविणारे, योजना आखणारे बव्हंश लोक शहरी असल्यामुळे ग्रामीण नागरिकांच्या या गैरसोयींची फारशी दखलच घेतली जात नाही. राजकीय नेतृत्वालाही ही समस्या अजेंड्यावर अग्रभागी घ्यावीशी वाटत नाही. शिवाय 'अशा' बाबतीत चारचौघांत बोलण्याची रीत नसल्याने कोणत्याही स्तरावर त्याची चर्चा होणे दुरापास्त होते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मोहिमेमुळे मात्र सूत्रे हलू लागली. त्यातही शहरी, मध्यमवर्गीय कल्पना कशा आडव्या आल्या, ते लेखकाने मार्मिकपणे दिले आहे. पश्चिम बंगालमधील नरेंद्रपूर येथे रामकृष्ण मिशन लोकशिक्षा परिषदेने नव्वदच्या दशकात युनिसेफच्या मदतीने आणि प. बंगाल सरकारच्या पाठिंब्याने एकात्मिक आरोग्यस्वच्छता प्रकल्प यशस्वीपणे राबवून अवघ्या २३० ते २५० रुपयांत किफायतशीर शौचालये बांधली होती. प्रशासकीय अधिकारी असलेल्या कुमार आलोकना प्रथम हे अविश्वसनीय वाटले, कारण शौचालयांचा सरकारी खर्च तीन हजार रुपये होता! शौचालयांची सुविधा नसणे हे केवळ मानवी सन्मानालाच बाधा आणणारे आहे असे नाही, तर त्यातून आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होतात. उघड्यावरील विष्ठा ही डायरिया, मलेरिया, जंतविकारासारखे पोटाचे आजार अशा अनेक घातक आजारांना निमंत्रण देते. लेखक सांगतो की आरोग्यविषयक स्वच्छतेच्या साध्या सोयी झाल्या तरी हे आजार ७७ टक्क्यांनी कमी होऊ शकतात. शौचालये नसल्याने महिलांची सर्वात अधिक कुचंबणा होते. भल्या पहाटे वा सायंकाळी अंधार पडल्यानंतरच त्यांना विधी उरकावे लागतात. कित्येक ठिकाणी लांबवर जावे लागते. गरोदरपणा, मासिक पाळीच्या वेळी तर हालांना पारावार नसतो. अनेक जीवघेणे आजार त्यातून जडतात. केवळ स्वच्छतागृहांची सोय नसल्याने पहिली ते आठवी या टप्प्यातच ५० टक्के मुलींची शाळांतून गळती होते, असे शिक्षणनियोजन आणि प्रशासन-विषयक राष्ट्रीय विद्यापीठाच्या अभ्यासअहवालात म्हटले आहे.

सर्वात रंजक माहिती आहे ती ही मोहीम राबवल्यास होणाऱ्या फायद्यांची. आजारपणे कमी झाल्याने उपचार, औषधे, प्रवास यांवरील खर्चात वर्षाला बाराशे कोटी डॉलर इतकी बचत भारत करू शकेल. मनुष्यतास वाढून उत्पादकता वाढेल. आता अनेक राज्यांनी ग्रामीण आणि शहरी स्वच्छता मिशन राबवायला सुरुवात केली आहे. दरवर्षी सुमारे ९ ते १० दशलक्ष घरांना शौचालयाची सोय उपलब्ध होत आहे आणि तरीही २०१५पर्यंत हागणदारीमुक्त ग्रामीण भारताची टक्केवारी ५७ टक्क्यांनी तर शहरी ५२ टक्क्यांनी वाढवायची आहे. त्या दृष्टीने अजून खूप मजल गाठायची आहे. ग्लॅमर जाऊच दे, पण फारशी मान्यताही नसलेला विषय मांडणारे हे पुस्तक नवी दृष्टी देणारे आहे.

**- प्रतिमा जोशी**

**स्क्वॉटिंग विथ डिग्निटीः लेसन्स फ्रॉम इंडिया.** लेखकः कुमार आलोक, प्रकाशकः सेज पब्लिकेशन्स, पानेः ३८०, किंमतः ८५० रु.